॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२४-२५/४३४५ दिनांक :३०/०४/२०२५

**<u>अत्यंत महत्वाचे</u>**

प्रति,
मा.प्राचार्य/केंद्रप्रमुख,
सर्व संलग्नित पदव्युत्तर (नियमित/बहिस्थ) महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: उन्हाळी-२०२५ च्या पदव्युत्तर (नियमित/बहिस्थ) अभ्यासक्रमाच्या दिनांक ०२/०५/२०२५ पासुन घेण्यात येणा-या परीक्षे बाबत.**
**संदर्भ: परीक्षा/समन्वय/२०२४-२५/४२८७ दिनांक १६/०४/२०२५**

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या पदव्युत्तर (नियमित/बहिस्थ NEP-2020 Pattern, Regular and Backlog) अभ्यासक्रमाच्या परीक्षेमध्ये काही विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर Manually (स्वनिर्णयाने) बैठक क्रमांक देऊन संबंधीत विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आलेली आहे, त्या कारणाने अशा विद्यार्थ्यांचा निकाल जाहिर झालेला नाही. त्यामुळे, उन्हाळी-२०२५ च्या परीक्षेसाठी एकाही विद्यार्थ्यांना परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त झालेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांना एमकेसीएलने जनरेट केलेले परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाच्या लागईनमध्ये किंवा विद्यार्थ्यांच्या मोबाईल ॲपव्दारे दिनांक २१/०४/२०२५ पर्यंत परीक्षा आवेदनपत्र (Submit) सादर करणेसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. या कालावधीत सुध्दा एमकेसीएलने जनरेट केलेले परीक्षा आवेदनपत्र (Submit) सादर केले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

उपरोक्त कारणामुळे विद्यार्थी हित लक्षात घेवून विद्यापीठाने पुन्हा दिनांक २९/०४/२०२५ पर्यंत परीक्षा आवेदनपत्र (Submit) सादर करण्यााठी मुदतवाढ दिलेली आहे. तरीही संबंधीत महाविद्यालयाकडून/विद्यार्थीकडून एमकेसीएलने जनरेट केलेले परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे संबंधीत विद्यार्थ्यांच्या उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार **दिनांक ०२/०५/२०२५ रोजी घेण्यात येणा-या पदव्युत्तर (नियमित/बहिस्थ) अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे.**

**ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र एमकेसीएलच्या पोर्टलवर जनरेट होवूनही सबमीट करण्यात आलेली नाही अशा विद्यार्थ्याना विद्यापीठाने पुनश्च दिनांक ०५/०५/२०२५ पर्यंत महाविद्यालयाच्या लागईन मधून व विद्यार्थ्याच्या मोबाईल ॲपव्दारे परीक्षा आवेदन भरण्यासाठी अंतीम मुदतवाढ देण्यात येत आहे. यानंतरही संबंधीत महाविद्यालय/विद्यार्थ्यांकडून एमकेसीएलने जनरेट केलेले परीक्षा आवेदनपत्र सादर (Submit) न केल्यास संबंधीत विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार नाही व त्यासंबंधी कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद प्राचार्य/विद्यार्थ्यानी घ्यावी.**

सबब, उपरोक्त पदव्युत्तर (नियमित/बहिस्थ) अभ्यासक्रमाच्या सुधारीत परीक्षेचे वेळापत्रक लवकरच महाविद्यालयाच्या लॉगईन किंवा विद्यार्थ्यांच्या मोबाईल ॲपमध्ये व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव:** एमकेसीएल, विद्यापीठ परिसर, नांदेड